# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

सकाळ

---

**दिनांक १८.०३.२०२३ शनीवार**

**(गुन्हे)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारुबंदी, जुगार, ड्रंकन ड्राईव्ह कायदा अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :**

नागपूर शहर पोलीसांनी नागपूर शहरातील पोलीस ठाणे हद्दीत मु.दा.का. अन्वये ०६ मध्ये एकुण ०६ ईसमावर कारवाई करून रू ५,६८०/— चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ११ केसेस मध्ये एकुण २२ ईसमावर कारवाई करून रू ३१,८२७/— चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकुण ३,८५३ वाहन चालकांवर कारवाई केली. व एकूण रू. २,२७,१५०/— रू तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून या पुढेही कारवाई प्रभावीपणे करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहनासंबंधी नियम पाळुन सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) पोलीस ठाणे गिट्टीखदान : — घरफोडी करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा दाखल**

दिनांक. १६.०३.२०२३ चे १७.३० वा ते दि. १७.०३.२०२३ चे १५.३० वा चे दरम्यान पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत प्लॉट न. २०३, गुरूदत्त सोसायटी, रिंग रोड, दाभा, नागपूर येथे राहणारे फिर्यादी महिपाल ब्रिजलाल सोनेवाने वय ५३ वर्ष, हे व त्यांची पत्नी दोघांची प्रकृति खराब झाल्याने त्यांनी आपले राहते घराला कुलूप लावुन लोकमत चौक, येथे दवाखान्यात काही दिवसा पासुन ॲडमीट असुन व त्यांचे घराची देखरेख करण्या करीता त्यांचा साडभाउ व साळी हे फिर्यादीचे घरात पाहण्याकरीता येत जात होते. दिनांक १७.०३.२०२३ चे १५.३० वा चे सुमारास त्यांचा साडभाउ व साळी हे फिर्यादीचे घराला पाहण्या करीता आले असता कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे कोंडा तोडुन घरात प्रवेश करून, बेडरूम मधील लाकडी कपाटात कापडी बॅग मध्ये ठेवलेले सोन्या— चांदीचे दागीने एकुण किंमती ३,७१,०००/रू चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो. ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि फड ९८२२६७२२३३ यांनी अज्ञात आरोपी विरूध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादवि अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपीचा शोध घेत आहे.

**(अंकुश राठोड)**
**पोलीस उप निरीक्षक**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी**
**नागपूर शहर**